**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १८/२०१८-१९/ 175 दिनांक: ३१.०७.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. १८(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | मे.तुळशी कास्टींग ॲन्ड मशिनिंग .<br>स्वाती बंगला प्लॉट क्र.१४ जयहिंद कॉलनी<br>सांगली जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग सांगली | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय सांगली यांच्या दिनांक २४.०४.२०१८ च्या आदेशाने व्यथीत होऊन, दाखल केलेली आहे.

31/7/2018

तक्रारदाराची तक्रार थोडक्यात अशी की, तक्रारदार जाबदार विज वितरण कंपनीचे उच्च दाब औद्योगिक ग्राहक होते. त्यांचा ग्राहक क्र. २७९२४९००५२८० असा होता. सदरचा वीज पुरवठा दिनांक २७.१०.२०१५ रोजी कायम स्वरुपी बंद करण्यात आलेला आहे. वीज नियामक आयोगाच्या केस क्र. ९४/२०१५ मधील दिनांक १९.०८.२०१६ च्या निकालानुसार आणि तक्रारदाराचे मागणीनुसार तक्रारदारास Continuous to Non-continuous अशा टेरिफ बदलाची फरकाची रक्कम देखिल तक्रारदरास देण्यात आलेली आहे .सदरची रक्कम ५५,२९,४०८ इतकी असून तक्रारदाराच्या बॅंक खातेवर दिनांक २३.११.२०१७ रोजी जमा करण्यात आलेली आहे .तक्रारदाराचे म्हणणे असे आहे की, सदर रक्कमवर त्यास व्याज मिळण्यास तक्रारदार पात्र आहेत. सबब व्याज मिळणेकरता त्यांनी मा.रा.आयोग यांच्याकडे केस १२१/२०१७ ही दाखल केली असता दिनांक ३१.०१.२०१८ या आदेशान्वये मा. राज्य आयोगाने फरकावरील व्याज हा वीज वितरण कंपनी आणि ग्राहक यामधील वादाचा विषय होत असून तो वाद निवारण करण्याकरिता निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेकडे , म्हणजे अंतर्गत निवारण कक्षाकडे किंवा या मंचाकडे तक्रार दाखल करण्याचे, आदेश देऊन सदरची याचिका निकाली काढलेली आहे. सबब तक्रारादाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली असता कक्षाने आपल्या दिनांक २४.०४.२०१८ आदेशाने मा.आयोगाच्या केस क्र. ९४/२०१५ मधील पारित आदेशांत टॅरिफ फरकाच्या परताव्याच्या रक्कमेवर व्याज देण्याबाबत कोणतेही स्पष्ट आदेश दिलेले नसल्याने आणि सांघिक कार्यालय मुंबई यांचे मार्गदर्शन मागविले असता कोणतेही आदेश न दिल्याने तक्रारदाराची व्याजाची मागणी मान्य करता येत नाही,असा निष्कर्ष काढून तक्रार फेटाळून लावली आहे. सबब तक्रारादाराने ही तक्रार या मंचापुढे दाखल करुन टॅरिफ फरकाच्या परताव्याची रक्कम देण्यात झालेल्या विलंबा करता, सदर रक्कम रु. ५५,२९,४०८ या रक्कमेवर द.सा.द.शे. ७ टक्के दराने एकुण १५ महिने कालावधीकरिता व्याजाची मागणी या कामी केलेली असून सदरची रक्कम तक्रारदाराचे बॅंक खात्यावर आर.टी.जी.एस. पध्दतीने जमा करण्याचे आदेश करावेत अशी मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर वि.प. कंपनीने या मंचासमोर हजर होउन आपले म्हणणे खालील प्रमाणे मांडलेले आहे.

सदर ग्राहकाचे मागणीनुसार व MERC कडील केस क्र.९४/२०१५ मधील दिनांक १९.०८.२०१६ रोजीच्या निकालाप्रमाणे ग्राहकास Continuous टॅरिफ मधील फरकाची रक्कम अदा करणेत आलेली आहे.

२) MERCकडील केस क्र. ९४/२०१५ चा निकाल १९.०८.२०१६ रोजी देण्यांत आला.सदर निकालास अनुसरुन महावितरण कंपनीकडील ज्या ग्राहकानी Continuous to Non- Continuous टेरिफ मधील फरकाची रक्कम मिळणेसाठी अर्ज दाखल केले होते,त्या ग्राहकांना फरकाची रक्कम अदा करणेसाठी कंपनीच्या संचालक मंडळाकडून दिनांक ०१.०६.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय घेणेत आला. संचालक मंडळ बैठकीतील निर्णयानुसार महावितरण कंपनीकडून परिपत्रक क्र. PR-३/Tarriff/१६७२० व २१४०० दिनांक ०१.०९.२०१७ द्वारे सदर फरकाची रक्कम कशा प्रकारे ग्राहकाना द्यावी याबाबत मार्गदर्शन सुचना देण्यात आल्या. सदर सुचना प्रमाणे मे. तुलसी कास्टींग ॲन्ड मशिनिंग यांना देय असलेली फरकाची रक्कम रु. ५५,२९,४०८/- त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांचे बॅंक खातेवर दिनांक २३.११.२०१७ रोजी जमा करणेत आली आहे.

३) MERC कडून केस क्र. ९४/२०१५ मधील निर्णयामध्ये ग्राहकाना टॅरिफ डिफरन्स मधील फरकाच्या रक्कमेवर व्याज देणेबाबत आदेश देणेत आलेले नाहीत. त्यामुळे ग्राहकास परतावा रक्कमेवर व्याज देणेत आलेले नाही.

४) Continuous ते Non- Continuous टॅरिफ मधील फरकाची देय रक्कम अदा करतेवेळी ग्राहकाने व्याज रक्कम मिळणेबाबत तक्रार केलेली नाही. परतावा रक्कमेचा प्रस्ताव ग्राहकाने स्विकारलेला असलेने ग्राहकाने केस क्र. १८/२०१८-१९ द्वारे केलेली मागणी नाकारणेत यावी.

५) रिटपिटीशन क्र. ५४३७/२०१३ मध्ये हायकोर्ट नागपूर बेंचकडून सेक्शन ६२(०६) प्रमाणे Continuous ते Non- Continuous Tarriff मधील फरकाच्या रक्कमेवर व्याज देणेचे नाकारले आहे. सदर निर्णयाचा विचार केस क्र. १८/२०१८-१९ मध्ये अंतिम आदेश देतेवेळी व्हावा.

६) केस क्र. ११३/२०१७ व केस क्र. ११५/२०१७ मध्ये MERC कडून ग्राहकाचा अर्जावर निर्णय घेणेमध्ये विलंब झालेने व्याज देणेचा आदेश झाला आहे. देणेत आलेले व्याज हे दंडात्मक असून टॅरिफ फरकामधील रक्कमेवर सेक्शन ६२(६) प्रमाणे व्याज देणेचा आदेश दिलेला नाही. सबब केस क्र. ११३/२०१७ व केस क्र. ११५/२०१७ मधील आदेश या केसला लागू होत नाही.

७) महावितरण कंपनी ही सार्वजनिक कंपनी असून Continuous ते Non- Continuous Tariff मधील फरकाची रक्कम ग्राहकांना परतावा करणे हा धोरणात्मक निर्णय असून सदर रक्कम परत करणेचा ठराव कंपनीच्या संचालक मंडळात घेणे आवश्यक आहे. कंपनीच्या संचालक मंडळाकडून दिनांक ०१.०६.२०१७ रोजी सदरचा निर्णय घेणेत आला व त्यानंतर Continuous ते Non- Continuous Tariff मधील फरकाची रक्कम ग्राहकांना परतावा करणेसाठी मार्गदर्शक सुचना संबंधीत कार्यालयांना देणेत आल्या. ग्राहकाला फरकाची रक्कम देणेमध्ये झालेला विलंब हा प्रशासकीय कार्यवाहीमुळे झालेला असून महावितरण कंपनीने कोणत्याही उद्देशाने फरकाची रक्कम परत करणेमध्ये विलंब केलेला नाही त्यामुळे ग्राहकाला परतावा रक्कमेवर व्याज देता येत नाही.

MERC कडील केस क्र. ९४/२०१५ मधील आदेशात व्याज देणेबाबत कोणतेही सूचना नसलेने तसेच मुख्य कार्यालयाकडून Continuous ते Non- Continuous Tariff मधील फरकाच्या रक्कमेवर व्याज देणेबाबत कोणत्याही सूचना नसलेने ग्राहकास Continuous ते Non- Continuous Tariff मधील फरकाच्या रक्कमेवर या कार्यालयाकडून व्याज देणेत आलेले नाही.

उभय पक्षकाराचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रावरुन या मंचाच्या निष्कर्षाकरता खालील मुद्दे उपस्थित होतात.

३१/७/२०१८

| मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|
| तक्रारदारास परताव्याच्या रक्कमेवर व्याज मागण्याचा अधिकार आहे काय? | होय |
| तक्रारदार ग्राहकाची मागणी योग्य आहे काय ? | होय |
| अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## <u>कारणे</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३:-</u>** प्रस्तुत प्रकरणास थोडा इतिहास आहे व प्रकरणाचे आकलन होणे करिता तो संक्षिप्त स्वरुपांत नमूद करणे आवश्यक आहे. प्रस्तुत तक्रारदारास दिनांक १८.०२.२००५ चे मंजूरी पत्र अन्वये ३००० KVA चा नवीन उच्च दाब वीज पुरवठा मंजूर करण्यात आलेला होता.त्या करिता सुरक्षा ठेव रक्कम रु. १९,७२,८००/- चा समावेश असणारी एकूण रक्कम रु. ४०,७७,९४०/- ही वि.प. कंपनीकडे जमा केलेली होती व करारपत्र करुन दिलेले होते. दिनांक ०५.१०.२०१५ चे अर्जाने तक्रारदाराने सदरचा वीज पुरवठा कायम स्वरुपी बंद करावा अशी मागणी केली होती व ती मागणी मंजूर होऊन दिनांक २७.१०.२०१५ पासून तक्रारदाराचा विद्युत पुरवठा कायम स्वरुपी खंडीत करण्यात आलेला होता. दिनांक २२.०१.२०१६ चे अर्जाने तक्रारदाराने सुरक्षा ठेव रक्कम परत मागीतली असता सदरची मागणी वि.प. कंपनीने अमान्य केलेली होती त्याकरिता तक्रारदाराने या मंचासमोर तक्रार दाखल केलेली होती.सदरची तक्रार या मंचाने ०८.११.२०१६ च्या आदेशाने ना-मंजूर केली.त्या विरुध्द तक्रारदाराने विद्युत लोकपालाकडे निवेदन सादर केले.मा. विद्युत लोकपालांनी आपले दिनांक ०६.०१.२०१७ च्या आदेशाने सदरचे निवेदन मंजूर करुन तक्रारदाराने Indemnity Bond सादर केल्यावर सदर आदेशाचे तारखेपासून एक महिन्याचे आत सुरक्षा ठेवीची रक्कम तक्रारदारास परत करावी असा आदेश पारित केला.तथापि सदर आदेशात सदर रक्कमेवर व्याज देण्याबाबत कोणताही आदेश पारित केलेला नव्हता. सदर आदेशाप्रमाणे तक्रारदारानी दिनांक २०.०१.२०१७ रोजी Indemnity Bond वि.प. कंपनीकडे सादर करुन देखिल वि.प. कंपनीने विद्युत लोकपालाचे आदेशाचे पालन केले नाही सबब तक्रारदाराने विद्युत कायदयाच्या कलम १४२ अन्वये वि.प. कंपनीवर कायदेशीर कारवाई होणेकरिता मा. विद्युत आयोगाकडे केस क्र. ४३/२०१७ दाखल केली होती सदर केसचा निकाल दिनांक २४.०१.२०१८ रोजी झाला .दरम्यानच्या काळात वि.प. कंपनीने दिनांक २३.११.२०१७ रोजी टॅरिफ बदलाची रक्कम रु. ५५,२९,४०८/- तक्रारदारास परत केली.

31/7/2013

दरम्यानच्या काळात तक्रारदाराने विद्युत आयोगासमोर टॅरिफ बदल फरकाच्या बदलाची रक्कम व त्यावरील व्याज याकरिता केस क्र. १२१/२०१७ दाखल केली होती.सदर प्रकरणाचा अंतिम निकाल दिनांक ३१.०१.२०१८ रोजी लागला.त्या निकालात मा. राज्य आयोगाने तक्रारदारास टॅरिफ बदल फरकाची एकूण रक्कम रुपये ५५,२९,४०८/- , वि.प. कंपनीने तक्रारदारास परत केली असल्याबद्दलची नोंद घेऊन त्या रक्कमेबाबत कोणताही आदेश केला नाही,परंतु त्या रक्कमेवर व्याज दिले गेलेले नाही हयाची नोंद घेऊन, व्याजाचा प्रश्न हा वि.प. कंपनी आणि तक्रारदार यांच्यातील वादाचा विषय होऊ शकतो व तो वाद हया मंचाकडे तक्रारदाराने प्रथम सोपवावयास होता असे मत प्रदर्शीत केले व तक्रारदारास या मंचाकडे प्रकरण दाखल करण्याचे सूचित केले व ते प्रकरण निकाली काढले.त्यानुसार तक्रारदार या मंचापुढे आलेला आहे.

या प्रकरणातील सर्व तथ्थे वर नमूद केल्याप्रमाणे, उभय पक्षी मान्य आहेत. त्यामुळे त्यांचा पुर्नउच्चार करणे आवश्यक नाही.तक्रारदारास परत करण्यात आलेल्या बदल फरक रक्कमेवरील व्याजबाबत वि.प. कंपनीचे एवढेच म्हणणे आहे की ,मा.वि.आयोगाकडून केस क्र. ९४/२०१५ मधील निकालामध्ये टॅरिफ डिफरन्स मधील फरकाच्या रक्कमेवर व्याज देण्याबाबत कोणतेही आदेश देण्यात आलेले नाहीत, त्यामुळे परतावा रक्कमेवर व्याज देण्यात आलेले नाही. तसेच रिटपिटिशन क्र. ५४३७/२०१३ या याचिकेतील आदेशात मा. मुंबई हायकोर्ट Continuous ते Non-Continuous टॅरिफ फरकाच्या रक्कमेवर व्याज देण्याचे नाकारलेले आहे याचा विचार प्रस्तुत प्रकरणात आदेश देताना विचार करावा .

वि.प.कंपनीचे वरील कथन प्रस्तुत प्रकरणात सर्वस्वी गैर लागु आहे असे या मंचाचे मत आहे. हे जरुर आहे की मा. वि. आयोगाच्या केस क्र. ९४/२०१५ मध्ये टॅरिफ डिफरन्स मधील फरकाच्या रक्कमेवर व्याज देण्याचा आदेश झालेला नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की त्यामुळे देय रक्कमेवर व्याज देताच येणार नाही. व्याजाची आकारणी आकार ही कायदयाच्या तरतूदीनुसार होत असते .

विज अधिनियम २००३ च्या कलम ६२(६) नुसार "जर कोणत्याही लायसनदाराने किंवा वीज निर्मिती करणा-या कंपनीने, या कलमान्वये निर्धारित केलेल्या प्रशुल्कापेक्षा अधिक किंमत किंवा आकार वसुल केला असेल तर, ज्या व्यक्तीने अशी किंमत किंवा आकार प्रदान केला असेल अशी व्यक्ती लायन्सदाराने केलेल्या अन्य कोणत्याही दायित्वास बाधा न येता, प्रदान केलेली अशी जादा रक्कम,बॅक दराच्या समकक्ष व्याजासह वसूल करील." कायदयाच्या या तरतूदीनुसार तक्रारदाराला व्याज मागण्याचा अधिकार निर्माण होतो असे या मंचाचे मत आहे.

ज्या मुंबई उच्च न्यायालयाच्या रिटपिटिशन न. ५४३७/२०१३ च्या निकालाचा उल्लेख विज वितरण कंपनीने आपल्या म्हणण्यात केलेला आहे,तो निकाल या मंचाच्या अवलोकनार्थ विज वितरण कंपनीने हजर केलेला नाही. मा. वि.लोकपाल किंवा राज्य विज आयोग यानी आपल्या निकालामध्ये तक्रारदारास व्याज देताच येणार नाही असे कुठेही म्हटलेले नाही किंवा त्याची व्याजाची मागणी फेटाळून लावलेली नाही. कलम ६२(६) चा विचार करता तक्रारदाराला टॅरिफ फरकाच्या रक्कमेवर व्याज मिळण्याचा अधिकार आहे असे या मंचाचे मत आहे सबब मुद्दा क्र. १व २ चे उत्तर आम्ही होकारार्थी दिलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणांत फरकाची रक्कम परत करण्यात एकूण १५ महिन्याचा विलंब झालेला आहे हे या प्रकरणी स्पष्ट आहे.या कालावधी करीता तक्रारदारास विज अधिनियम २००३ च्या कलम ६२(६) अन्वये बँक दराप्रमाणे व्याज मिळण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत आदेशाच्या तारखेच्या दिवशी राष्ट्रीयकृत बँका, ठेवीवर ५ टक्के पेक्षा जास्त द.सा.द.शे.दराने व्याज देत नाहीत याची न्यायीक नोंद (Judicial Note ) हे मंच घेत आहे आणि त्या दराने तक्रारदारास टॅरिफ बदलाच्या रक्कमेवर दिनांक २०.०८.२०१६ ते २३.११.२०१७ हया कालावधी करिता व्याज मिळण्यास, तक्रारदार पात्र आहे असे या मंचाचे मत आहे.

सबब आम्ही खालील आदेश पारित करत आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास वि.प. कंपनीने टॅरिफ बदलाच्या फरकाची रक्कम रुपये ५५,२९,४०८/- हया रक्कमेवर दिनांक २०.०८.२०१६ ते २३.११.२०१७ हया कालावधीकरता द.सा.द.शे. ५ टक्के दराने व्याज द्यावे. सदर व्याजाची रक्कम या आदेशाचे तारखेपासून २ महिन्याचे आत तक्रारदाराचे बँक खातेवर आर.टी.जी.एस.ने जमा करावेत. तक्रारदाराने बँक खातेचे तपशील वि.प. कंपनीकडे त्वरीत द्यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

३१/७/१८

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे) ३१/७/२०१८
अध्यक्ष